मंगळवार, दि. १९ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २५७ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

नेत्रज्योती हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

## महापालिकेचा ‘बुलडोझर’

### ७० दुकानांचे अतिक्रमण जमीनदोस्त, नाले केले मोकळे





**जालना । प्रतिनिधी -** जुन्या जालन्यातील अत्यंत गजबजलेल्या भाजीमंडी परिसरात आज जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने एक मोठी आणि धडक अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. या धडक कारवाईत परिसरातील सुमारे ७० दुकानांसमोरील नाल्यांवर केलेले पक्के व कच्चे अतिक्रमण प्रशासनाने पूर्णपणे जमीनदोस्त केले. नाल्यांवर बेकायदेशीरपणे टाकण्यात आलेले लोखंडी व पत्र्यांचे शेड्स निष्कासित करून नाले मोकळे करण्यात आले आहेत. महापालिकेच्या या अचानक आणि धडक कारवाईमुळे शहरातील अतिक्रमणधारकांमध्ये आणि व्यापाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

जालना शहर महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा यांच्या थेट आदेशान्वये आणि सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांच्या थेट मार्गदर्शनाखाली ही मोहीम हाती घेण्यात आली. जुन्या जालन्यातील भाजीमंडी परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून रस्त्यांच्या कडेला आणि मुख्य नाल्यांवर दुकानदारांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे केली होती. यामुळे पावसाळी पाण्याचा निचरा होणारे नाले तुंबून अस्वच्छता पसरत होती, तसेच भाजीखरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना व वाहनांना मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर महापालिकेने ही कठोर पावले उचलली.

जेसीबी आणि टिप्परच्या साहाय्याने धडक कारवाई

आज सकाळीच महापालिकेचे अतिक्रमण निर्मूलन पथक संपूर्ण तयारीनिशी भाजीमंडी परिसरात दाखल झाले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे दुकानदारांची एकच धावपळ उडाली. अतिक्रमण पथकप्रमुख बी. सी. राठोड यांच्या नेतृत्वाखाली १ जेसीबी आणि १ टिप्परच्या साहाय्याने नाल्यांवरील सिमेंटचे ओटे, लोखंडी अँगल आणि पत्र्यांचे शेड तोडण्यास सुरुवात झाली. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस कर्मचाऱ्यांच्या खंबीर सहकार्यामुळे ही मोहीम शांततेत पार पडली.

पथकातील सहभागी अधिकारी व कर्मचारी

या मोठ्या मोहिमेमध्ये सहाय्यक पथकप्रमुख शामसन कसबे, पान २ वर

उपमहापौर राजेश राऊत यांचा मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद

## ई-स्कूटरने गाठली मनपा

**जालना । प्रतिनिधी -** वाढते इंधन दर, प्रदूषणाची गंभीर समस्या आणि पर्यावरण संवर्धनाची गरज लक्षात घेता जालना महानगरपालिकेचे उपमहापौर राजेश राऊत यांनी एक सकारात्मक आणि प्रेरणादायी उपक्रम राबवत नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला आहे. नेहमीप्रमाणे चारचाकी वाहनाचा वापर न करता त्यांनी थेट ई-स्कूटरवरून महानगरपालिकेत हजेरी लावत इंधन बचतीचा आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश दिला.

उपमहापौरांच्या या कृतीची जालना शहरात सर्वत्र चर्चा रंगली असून, सामान्य नागरिकांसह तरुण वर्गातूनही त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. वाढत्या पेट्रोल-डिझेल दरांमुळे नागरिक त्रस्त असताना, पर्यायी ऊर्जेच्या वापराकडे वळण्याची गरज दिवसेंदिवस अधिक अधोरेखित होत आहे. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींनी स्वतः पुढाकार घेतल्यास समाजात सकारात्मक बदल घडू शकतो, असे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

अलीकडेच राज्याचे मुख्यमंत्री यांनी ‘वर्षा’ निवासस्थान ते मंत्रालय असा दुचाकीवरून प्रवास करत इंधन बचतीचा संदेश दिला होता. त्याच धर्तीवर प्रेरणा घेत उपमहापौर राजेश राऊत यांनीही चार्जिंगवर चालणाऱ्या ई-स्कूटरचा वापर करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

देशाचे पंतप्रधान यांनीदेखील वेळोवेळी इंधन बचत, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्याचे आवाहन केले आहे. केंद्र सरकारकडूनही ई-वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. त्याच पार्श्वभूमीवर जालन्यातील हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे.




यावेळी माध्यमांशी संवाद साधताना उपमहापौर राजेश राऊत म्हणाले की, ‘‘पेट्रोलची बचत आणि पर्यावरण संवर्धन ही आता काळाची गरज बनली आहे. वाढते पान २ वर

२० मे रोजी औषध विक्रेत्यांचा देशव्यापी संप

## रुग्णांनी आवश्यक औषधांचा साठा करून ठेवावा, प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेच्या वतीने येत्या बुधवार, दिनांक २० मे २०२६ रोजी देशव्यापी लाक्षणिक संप पुकारण्यात आला आहे. या संभाव्य संपाच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील नियमित औषधोपचार सुरू असलेल्या रुग्णांची तसेच नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने खबरदारीचे उपाय योजले असून नागरिकांना आवश्यक औषधांचा आगाऊ साठा करून ठेवण्याचे आवाहन केले आहे. अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने आपल्या विविध मागण्यांसाठी २० मे रोजी देशभरातील औषध दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असून, तशी पूर्वकल्पना अन्न व औषध प्रशासन विभागाला () दिली आहे. या संपामध्ये स्थानिक औषध विक्रेता संघटनेच्या सभासदांनी व औषध विक्रेत्यांनी सहभागी होऊ नये आणि रुग्णांची सेवा खंडित करू नये, याबाबत प्रशासनाच्या वतीने त्यांना पत्राद्वारे रीतसर विनंती करण्यात आली आहे. तथापि, संप झाल्यास ऐनवेळी रुग्णांचे हाल होऊ नयेत, यासाठी ज्या रुग्णांना दररोज किंवा दीर्घकालीन औषधांची आवश्यकता असते (जसे की मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार इत्यादी), अशा रुग्णांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक असणारी औषधे अगोदरच खरेदी करून सुरक्षित साठा करून ठेवावा, अशी सूचना प्रशासनाने दिली आहे.

संपाच्या कालावधीत जिल्ह्यातील गरजू रुग्णांना कोणतीही अत्यावश्यक औषधे उपलब्ध न झाल्यास किंवा गंभीर वैद्यकीय परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांच्या मदतीसाठी प्रशासनाने विशेष व्यवस्था केली आहे. औषधांची तीव्र टंचाई किंवा आणीबाणीची गरज भासल्यास नागरिकांनी थेट अन्न व औषध प्रशासन कार्यालयाशी संपर्क साधावा.

यासाठी सहाय्यक आयुक्त (औषधे) श्री. जी. डी. जाधव यांच्या ८३७९० १६०६८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क पान २ वर

## सरकारने शेतकरी, तरुणांचे प्रश्न तातडीने सोडवावेत, अन्यथा शिवसेना रस्त्यावर उतरेल

### जिल्हा संघटक भानुदास घुगे यांचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** ‘‘सध्याचे सरकार सर्वसामान्य जनता, शेतकरी आणि सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या मूळ प्रश्नांना बगल देऊन केवळ राजकारणात मग्न आहे. सत्ताधारी जनतेच्या प्रश्नांकडे डोळेझाक करत आहेत. सरकारने शेतकरी, तरुण आणि सर्वसामान्यांचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अन्यथा शिवसेना यापुढे अधिक आक्रमक होऊन रस्त्यावर उतरेल,‘‘ असा तीव्र इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा संघटक भानुदास घुगे यांनी दिला.

जालना येथे आयोजित पक्षाच्या प्रमुख बैठकीत व निदर्शनांवेळी ते बोलत होते. यावेळी शिवसैनिकांनी सरकारच्या शेतकरी आणि जनविरोधी धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

जनतेच्या प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष

उपस्थितांना संबोधित करताना भानुदास घुगे यांनी सरकारच्या कारभारावर कडक शब्दांत ताशेरे ओढले. ते म्हणाले की, आज जिल्ह्यातील आणि राज्यातील शेतकरी अस्मानी आणि सुलतानी संकटामुळे उद्ध्वस्त झाला आहे. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ यामुळे पिकांचे अतोनात नुकसान होऊनही शेतकऱ्यांना वेळेवर आणि पुरेशी मदत दिली जात नाही. केवळ पोकळ घोषणा करून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली जात आहेत. कर्जमाफी आणि योग्य भरपाईसाठी बळीराजा प्रशासनाचे उंबरठे झिजवत आहे.



दुसरीकडे, सुशिक्षित तरुण हाताला रोजगारासाठी भटकत आहेत. भरती प्रक्रिया रखडल्या आहेत, पेपरफुटीचे सत्र सुरू आहे, मात्र तरुणांच्या भविष्याची सरकारला काहीही काळजी नाही. महागाईने होरपळलेला सर्वसामान्य माणूस न्याय मागण्यासाठी कोणाकडे जावा, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

...तर शिवसेना स्टाईलने आंदोलन

‘‘सरकारने जर आपली कुंभकर्णी झोप सोडली नाही आणि पान २ वर

## नीट बाबत जनहित याचिका दाखल करणार - ॲड. रोहित बनवसकर

**जालना । प्रतिनिधी -** प्रचंड मेहनत आणि कष्ट घेऊन अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भविष्याचा खेळ खंडोबा मांडला जात असून चार वेळा नीट परीक्षेचे पेपर फुटले विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शासनाने घोटाळ्याची निवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी करावी आणि कायमस्वरूपी पायबंद घालावा याकरिता उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असल्याची माहिती आझाद हिंद विद्यार्थी सेनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. रोहित बनवसकर यांनी आज दिली.

नीट परीक्षा देशातील लाखो विद्यार्थ्यांचं आयुष्य, मेहनत आणि भविष्यातील स्वप्नांशी जोडलेली आहे. अनेक विद्यार्थी दोन, तीन वर्षे दिवस-रात्र अभ्यास करून या परीक्षेची तयारी करतात. पालक मोठ्या आर्थिक अडचणी सहन करून मुलांना सुविधा पुरवतात. नीट पेपरफुटी प्रकरणामुळे ‘‘जर प्रश्नपत्रिकाच आधी बाहेर जाणार असेल, तर आमच्या प्रामाणिक मेहनतीची किंमत काय?’’ असा संतप्त सवाल विद्यार्थ्यांकडून विचारला जातोय.असे नमूद करत बनवसकर म्हणाले,

परीक्षेच्या दिवशी विद्यार्थ्यांवर अत्यंत कठोर नियम लादले गेले.

काही विद्यार्थ्यांना पाण्याची सुविधा नव्हती, तर काही ठिकाणी उन्हात तासनतास उभे राहावे लागले. एखादा विद्यार्थी फक्त एका मिनिटाने उशीर झाला तरी त्याला परीक्षा केंद्रात प्रवेश नाकारण्यात आला. विद्यार्थ्यांना झिरो टॉलरन्स दाखवणारी व्यवस्था स्वतःच्या सुरक्षेतील अपयशाबाबत मात्र मौन का बाळगतेय ?हा प्रश्न आज प्रत्येक विद्यार्थी विचारत आहे.

पेपरफुटीच्या आरोपांनी संपूर्ण परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास हारवला, अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या. जर काही लोकांना प्रश्नपत्रिका आधीच मिळत असेल, तर प्रामाणिक विद्यार्थ्यांसाठी ही केवळ अन्यायाची बाब नाही, तर त्यांच्या भविष्याशी केलेला विश्वासघात आहे. गरीब आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याचा सर्वाधिक फटका बसतोय.

आज शिक्षण क्षेत्रात कोचिंग इंडस्ट्री हजारो कोटींची व्यवस्था बनली आहे. पालक आपल्या मुलांच्या भविष्यासाठी लाखो रुपये खर्च करत आहेत. या संस्थांवर पुरेशी आर्थिक आणि प्रशासकीय तपासणी होते का? हा देखील गंभीर प्रश्न आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्यावर व्यवसाय उभा करणाऱ्या या मोठ्या कोचिंग व्यवस्थेची आर्थिक चौकशी करावी अशी मागणी बनवसकर यांनी केली.

पुन्हा परीक्षा घेणे हा प्रशासनाचा तात्पुरता उपाय असू शकतो; परंतु विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि आर्थिक नुकसानाची भरपाई त्यामुळे होत नाही. परत परीक्षेमुळे अभ्यासाचा ताण, पुन्हा प्रवास खर्च, मानसिक संघर्ष. अनेक विद्यार्थी आधीच तणाव, भीती आणि असुरक्षिततेच्या वातावरणातून जात आहेत. काही पालकांनी कर्ज काढून मुलांच्या शिक्षणासाठी खर्च केला आहे. अशा वेळी ‘‘पुन्हा परीक्षा घ्या’’ असे सांगणे सोपे असले तरी विद्यार्थ्यांच्या तुटलेल्या आत्मविश्वासाची भरपाई करणे इतके सोपे नाही. असे त्यांनी सांगितले.



पारदर्शक आणि सुरक्षित परीक्षा व्यवस्थेची. गरज असून या संपूर्ण प्रकरणात विद्यार्थ्यांच्या मूलभूत अधिकारांचे गंभीर उल्लंघन झाले असल्याची आमची भूमिका आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार आहोत. सध्या न्यायालयीन सुट्ट्या सुरू असल्या तरी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित हा अत्यंत गंभीर आणि तातडीचा विषय असल्यामुळे न्यायालयाने याकडे संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. अशी अपेक्षा रोहित बनवसकर यांनी केली.

## संशयित गोवंशाच्या मांसाची वाहतूक उघड; १५० किलो मांस जप्त

**जालना । प्रतिनिधी -** शहरालगतच्या रेवगाव रोड परिसरामध्ये आज, सोमवार दिनांक १८ मे २०२६ रोजी सकाळी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. संशयित गोवंशाच्या मांसाची बेकायदेशीर वाहतूक करणारा एक ऑटो रिक्षा ग्रामस्थांनी रंगेहात पकडला. या प्रकारामुळे परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला असून, संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी संबंधित ऑटो रिक्षाची मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली. या कारवाईत सुमारे १५० किलो संशयित गोमांस जप्त करण्यात आले असून जालना तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, आज सकाळी १० वाजेच्या सुमारास रेवगाव रोडवरून एक ऑटो रिक्षा संशयास्पद रितीने जात असताना ग्रामीण भागातील काही सतर्क ग्रामस्थांनी त्याला थांबवले. ऑटोची तपासणी केली असता, त्यात मोठ्या प्रमाणावर गोवंश जातीचे मांस लपवून नेले जात असल्याचे उघड झाले. हा प्रकार पाहताच उपस्थित ग्रामस्थांचा संताप अनावर झाला आणि त्यांनी घटनास्थळीच त्या ऑटो रिक्षाची तोडफोड करण्यास सुरुवात केली. यामुळे रेवगाव रोडवर काही काळ मोठी खळबळ उडाली होती.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तातडीने गौरक्षक दलाच्या कार्यकर्त्यांना पाचारण केले. गौरक्षक दलाचे पदाधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी या गंभीर प्रकरणाची माहिती जालना तालुका पोलीस ठाण्याला दिली. माहिती मिळताच तालुका पोलिसांचे पथक फौजफाट्यासह घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी संतप्त जमावाला शांत करत पान २ वर

## संपादकीय पान

# शेतकऱ्यांच्या जिवावर उभे 'खत माफिया'चे साम्राज्य

जालना जिल्ह्यात उघडकीस आलेल्या संशयित अनधिकृत खतसाठा प्रकरणाने केवळ एका गोदामाचा किंवा एका व्यापाऱ्याचा प्रश्न समोर आणलेला नाही; तर संपूर्ण कृषी व्यवस्थेतील धोकादायक वास्तव उघडे केले आहे. तब्बल १८ लाख रुपयांचा खतसाठा, परवान्याबाहेरील गोदाम, संशयास्पद वाहतूक, बनावट बिलिंग आणि काळाबाजाराच्या शक्यतेने हा प्रकार अत्यंत गंभीर बनला आहे. कृषी विभागाच्या भरारी पथकाने केलेली कारवाई कौतुकास्पद असली, तरी हा प्रश्न इतक्यावर संपणारा नाही. उलट हा संपूर्ण 'खत माफिया'च्या जाळ्याचा फक्त एक भाग असू शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. भारतीय शेती आधीच अनेक संकटांशी झुंज देत आहे. कधी अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ, कधी बाजारभावातील घसरण, तर कधी वाढती उत्पादन खर्चाची समस्या. अशा परिस्थितीत शेतकरी पीक उत्पादनासाठी खतांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो. पण जर त्यालाच बनावट, निकृष्ट किंवा अनधिकृत खत मिळाले, तर तो आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे उद्ध्वस्त होऊ शकतो. पीक नष्ट होते, उत्पादन घटते आणि कर्जबाजारीपणाचा दुष्टचक्र अधिक तीव्र बनतो. त्यामुळे खतांमधील गैरव्यवहार हा केवळ आर्थिक गुन्हा नसून तो थेट शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळणारा सामाजिक अपराध आहे. या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे माल एका ठिकाणासाठी दाखवला जातो आणि प्रत्यक्षात दुसऱ्याच अनधिकृत गोदामात उतरवला जातो. याचा अर्थ केवळ नियमभंग नाही, तर नियोजनबद्ध साखळी कार्यरत असल्याचा स्पष्ट संकेत आहे. खत नियंत्रण आदेश, अत्यावश्यक वस्तू कायदा आणि भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हे दाखल झाले असले तरी प्रश्न असा आहे की, अशा प्रकारचे रॅकेट इतक्या मोठ्या प्रमाणात सुरू असताना प्रशासनाला याची माहिती आधी का मिळाली नाही? आणि जर माहिती होती, तर कारवाई उशिरा का झाली? शेतकऱ्यांसाठी अनुदानित खतांची योजना सरकार राबवते, मात्र त्याच खतांचा काळाबाजार होऊन कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते, ही वस्तुस्थिती अधिक धक्कादायक आहे. यामागे काही व्यापारी, साठेबाज, वाहतूक साखळी आणि काही भ्रष्ट यंत्रणांचा संगनमताचा संशय नाकारता येत नाही. कारण अशा मोठ्या प्रमाणातील साठवणूक आणि वाहतूक कोणाच्या तरी संरक्षणाशिवाय शक्य नसते. या कारवाईत जप्त करण्यात आलेले नमुने प्रयोगशाळेत पाठवले जाणार आहेत. जर हे खत निकृष्ट किंवा बनावट आढळले, तर हा प्रकार आणखी गंभीर ठरणार आहे. कारण याचा थेट परिणाम जमिनीच्या सुपीकतेवर, उत्पादनक्षमतेवर आणि शेतीच्या भविष्यावर होतो. आधीच रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीची गुणवत्ता खालावत चालली आहे. त्यात बनावट खतांचा वापर म्हणजे शेतीच्या मुळावरच घाव आहे. आज गरज आहे ती केवळ कारवाईची नाही, तर संपूर्ण खत वितरण व्यवस्थेच्या सखोल चौकशीची. जिल्ह्यातील सर्व खत गोदामांची तपासणी, वाहतूक साखळीचे ऑडिट, परवान्यांची पडताळणी आणि शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणाऱ्या खतांच्या गुणवत्तेचे नियमित परीक्षण होणे आवश्यक आहे. कृषी विभागाने केवळ धाडी टाकून थांबता कामा नये, तर दोषींना कठोर शिक्षा होईल याची खात्री करावी. अन्यथा काही दिवसांच्या चर्चेनंतर पुन्हा तेच रॅकेट नव्या नावाने सुरू होईल. शेतकऱ्यांनीही जागरूक होण्याची गरज आहे. अधिकृत विक्रेत्याकडूनच बिलासह खत खरेदी करणे, संशयास्पद मालाबाबत तक्रार करणे आणि स्वस्ताच्या आमिषाला बळी न पडणे महत्त्वाचे आहे. कारण शेती ही केवळ व्यवसाय नाही; ती देशाच्या अन्नसुरक्षेचा आधार आहे. जालना प्रकरणाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे  शेतकरी आज केवळ निसर्गाशीच नाही, तर बाजारातील फसवणूक आणि व्यवस्थेतील भ्रष्ट प्रवृत्तींशीही लढत आहे. जर प्रशासनाने वेळेत कठोर पावले उचलली नाहीत, तर उद्याचा सर्वात मोठा बळी पुन्हा एकदा शेतकरीच ठरणार आहे.

# शिक्षण क्षेत्राला लागलेला कलंक

जळगाव जिल्ह्यात धरणगाव तालुक्यातील एका गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकानेच चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा लैंगिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी आरोपी शिक्षक मराठे याच्याविरुद्ध धरणगाव पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.व शिक्षकाला अटक केल्याची घटना वाचण्यात आली. पीडित मुलगी ही आपल्या कुटुंबीयांसह धरणगाव तालुक्यातील एका गावात राहते. ती जि. प. शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत आहे. संशयित आरोपी शिक्षक  मराठे हा तिला शाळा भरण्यापूर्वी सकाळी दहा वाजता झाडू मारण्याच्या बहाण्याने शाळेत बोलावून घेत असे. कुणी नसल्याचा फायदा घेऊन तो तिच्यासोबत घृणास्पद कृत्य करायचा. इतकेच नव्हे तर तिला मोबाइलवर अश्लील व्हिडिओ दाखवून तिचा लैंगिक छळ करत असल्याचा संतापजनक प्रकार पुढे आला आहे.

अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणा मुळे समाजात संतापाची लाट उसळली आहे. याआधीही बदलापूरमध्ये एका शाळेत २ अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना घडली होती

अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या उच्च माध्यमिक शाळेत एका शिक्षकाने अश्लिल व्हिडिओ दाखवत सहा विद्यार्थीनींचा छळ केल्याची ही घटना होती. पुण्यातील भवानी पेठ भागात शाळेतील अशीच घडतात घडली होती. गेल्या काही महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या बऱ्याच घटना आपल्यासमोर आलेल्या आहेत.परत परत त्या सांगण्याची आवश्यकता नाही.

मुलगी शिकली, प्रगती झाली हा संदेश घेऊन आज आपण एकविसाव्या शतकात वावरत आहोत.

आजच्या काळात मुलींनी प्रत्येक क्षेत्रात स्वतःला सिद्ध केले आहे.

डिजिटल इंडिया आणि प्रगतीच्या मोठ्या मोठ्या गप्पा मारत आहोत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांनी अतोनात कष्ट सोसून, अंगावर शेण-दगड झेलून मुलींच्या शिक्षणाची पायाभरणी केली. त्यांच्याच प्रयत्नांमुळे आज आपल्या लेकी-सुना डॉक्टर, इंजिनिअर, पायलट आणि अंतराळवीर बनून देशाचे नाव उज्ज्वल करत आहेत.

परंतु, अलीकडच्या काळात शिक्षण क्षेत्रात घडणाऱ्या अशा काही कलंकित आणि दुर्दैवी घटनांमुळे या प्रगतीला ब्रेक लागण्याची भीती निर्माण झाली आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे, मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण पुन्हा कमी होईल की काय, अशी धास्ती संपूर्ण समाजात व्यक्त होत आहे.

शाळा आणि महाविद्यालये ही ज्ञानाची पवित्र मंदिरे मानली जातात. पालकांचा शिक्षकांवर आणि शैक्षणिक संस्थांवर देवासारखा विश्वास असतो. परंतु, काही नराधमांच्या विकृत मानसिकतेमुळे या पवित्र क्षेत्राला काळीमा फासला जात आहे. शाळांमध्ये अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार, छेडछाड आणि मानसिक छळ अशा घटनांमुळे संपूर्ण समाज सुन्न झाला आहे. ज्या हातांनी मुलींना लेखणी धरायला शिकवायची, त्याच हातांकडून जर विश्वासघात होत असेल, तर मुलींनी सुरक्षित कुठे राहायचे, हा मोठा प्रश्न आहे. शिक्षकांचे नीतिमत्तेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या अनुचित घटनांचे परिणाम अत्यंत दूरगामी आणि चिंताजनक आहेत.या काळ्या घटनांमुळे आज शिक्षण क्षेत्राला मोठा कलंक लागला आहे. ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंतच्या पालकांच्या मनात आज तीव्र भीती निर्माण झाली आहे. मुलगी शिकली तर प्रगती होईल, पण ती सुरक्षित राहिली तरच ना? असा उद्विग्न प्रश्न आज प्रत्येक आई-वडील विचारत आहेत.

या भीती मुळे अनेक पालक सुरक्षिततेच्या कारणास्तव मुलींना दूरच्या शाळा किंवा कॉलेजमध्ये पाठवणे बंद करत आहेत.

सुरक्षेची हमी नसल्यामुळे अनेक गरीब आणि मध्यमवर्गीय पालक मुलींचे शिक्षण मध्येच थांबवण्याचा विचार करू लागले आहेत.

अशा घटनांमुळे शिकणाऱ्या मुलींच्या मनात सतत एक प्रकारची भीती आणि दडपण असते. याचा थेट परिणाम त्यांच्या अभ्यासावर आणि गुणवत्तेवर होत आहे.

हा कलंक पुसण्यासाठी आणि मुलींचे शिक्षण अखंडित ठेवण्यासाठी खालील उपाययोजना तातडीने करणे गरजेचे आहे: कठोर कायदे असले तरी  अंमलबजावणी आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील गुन्हेगारांना फास्ट ट्रॅक कोर्टाद्वारे तात्काळ आणि कठोर फाशीसारखी शिक्षा झाली पाहिजे, जेणेकरून कोणाचीही अशी हिंमत होणार नाही.

सीसीटीव्ही आणि सुरक्षा प्रत्येक शाळेत, वर्गात आणि आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक असावेत. शाळांच्या सुरक्षा व्यवस्थेचे दृष्टीने अंतर्गत तक्रार समिती असायला हवी. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत महिला शिक्षिका आणि पालकांची समिती असावी, जिथे मुली न घाबरता आपली तक्रार मांडू शकतील. ग्रामीण भागातून येणाऱ्या मुलींसाठी हक्काची आणि सुरक्षित सरकारी बस सेवा किंवा शाळांची स्वतःची सुरक्षित वाहतूक व्यवस्था असावी. अशा वाहतूक व्यवस्थेतही बऱ्याच वेळा वाईट प्रकार घडतात त्यावरही संस्थाचालकांचे लक्ष असायला हवे.

शिक्षण क्षेत्रातील या विकृतींचा वेळीच बिमोड केला नाही, तर सावित्रीबाईंच्या लेकींचे शिक्षण धोक्यात येईल. हा केवळ एका मुलीचा किंवा कुटुंबाचा प्रश्न नसून संपूर्ण राष्ट्राच्या प्रगतीचा प्रश्न आहे. समाज, शासन आणि शैक्षणिक संस्थांनी मिळून मुलींना सुरक्षित आणि भयमुक्त वातावरण देणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. जेव्हा प्रत्येक मुलगी निर्भयपणे शाळेत जाईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने देशाचा विकास होईल.

शिक्षण क्षेत्रात घडणाऱ्या क्लेशदायक घटना आणि त्यामुळे मुलींच्या शिक्षणावर निर्माण झालेली धास्ती निर्माण झालेली आहे त्यामुळेच अत्यंत वेदनेने आणि संतापाने  विचारावेसे वाटते की, आज सावित्रीबाईंच्या लेकी खरोखरच




सुरक्षित आहेत का?

जर मुली घरातच बसल्या, तर आपल्या देशाची अर्धी शक्ती अंधारात ढकलली जाईल. या विकृतीचा वेळीच बिमोड करणे ही आज काळाची गरज आहे.

यासाठी आपल्याला काही कठोर पावले उचलावी लागतील: शाळा आणि कॉलेजांमध्ये नराधमांना पाठीशी घालणाऱ्या व्यवस्थापकांवर आणि दोषींवर फास्ट ट्रॅक कोर्टाद्वारे तात्काळ कठोर कारवाई झाली पाहिजे.

महिला सुरक्षा समित्या केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष कार्यरत असणे बंधनकारक केले पाहिजे. मुलींना स्वसंरक्षणाचे धडे ( ) देणे. आपल्या राज्यात शिक्षण विभागासाठी स्वतंत्र मंत्री आहे. जिल्हा परिषद मध्ये स्वतंत्र माध्यमिक शाळा आणि प्राथमिक शाळा यांचे जिल्हा शिक्षणाधिकारी आहेत. तसेच तालुका पातळीवर गटशिक्षणाधिकारी यांची नेमणूक असते. ते वेळोवेळी शाळांना भेटी देऊन एकूणच शाळेची तपासणी करत असतात. स्थानिक ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, यांच्यामध्ये सुद्धा शिक्षण विभाग असतो. शिक्षण सभापती असतात त्यांची ही समिती असते. त्यांचे सुद्धा या शाळांवर नियंत्रण  असायला हवे. शाळेची व्यवस्थापक कमिटी असते या कमिटीने सुद्धा शाळेतील शिक्षक येथील वातावरण शिक्षक मुला मुलीचे मध्ये असलेले संबंध याकडे  लक्ष देणे आवश्यक आहे. बऱ्याच दिवसापासून घटना घडत असते मग त्याकडे मुख्याध्यापक संस्थेचे  सदस्य यांचे लक्ष कसे नसते.? हा  सुद्धा एक विचार करण्यासारखा भाग आहे.

शाळेमध्ये शिक्षकांच्या मोबाईल वापरावरही नियंत्रण आवश्यक आहे. कार्यालयीन वेळात मोबाईल बघणे किंवा शाळेमध्ये मोबाईल वापरावर बंधन असणे आवश्यक आहे.

शिक्षण क्षेत्राला लागलेला हा कलंक आपल्याला धुवून काढावाच लागेल. सावित्रीबाईंनी लावलेले हे शिक्षणाचे रोपटे सुकू द्यायचे नसेल, तर सरकार, समाज, शाळा आणि आपण सर्वांनी मिळून मुलींना एक सुरक्षित आणि भयमुक्त वातावरण दिले पाहिजे. जेव्हा प्रत्येक मुलगी न घाबरता, ताठ मानेने शाळेत जाईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने आपल्या देशाची प्रगती होईल.

नक्कीच, शिक्षण क्षेत्रात घडणाऱ्या क्लेशदायक घटना आणि त्यामुळे मुलींच्या शिक्षणा संदर्भात धास्ती निर्माण झालेली आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात-

''झाली पाहिजे शिक्षणक्रांती,
तरच लाभेल देशाला शांती...''

परंतु आज आपल्या देशात शिक्षणक्रांती तर दूरच, पण शिक्षण क्षेत्राला लागलेल्या कलंकामुळे समाजात अशांतता आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंतच्या पालकांच्या मनात आज प्रचंड भीती निर्माण झाली आहे. आज एखादी मुलगी वेळेत शाळेतून घरी परतली नाही, तर आई-वडिलांच्या काळजाचा ठोका चुकतो. मुलगी शिकली तर प्रगती होईल, पण ती सुरक्षित राहिली तरच ना? असा उद्विग्न प्रश्न आज प्रत्येक सामान्य कुटुंबात विचारला जात आहे.

विशेषतः ग्रामीण भागात, जिथे शाळा घरापासून दूर असतात, तिथे सुरक्षिततेची हमी नसल्यामुळे अनेक गरीब आणि मध्यमवर्गीय पालक मुलींचे शिक्षण मध्येच थांबवण्याचा विचार करू लागले आहेत. ''नको ते शिक्षण आणि नको ती नोकरी, माझी मुलगी घरात सुरक्षित राहिलेली बरी,'' ही मानसिकता पालकांमध्ये पुन्हा निर्माण होणे म्हणजे आपण वैचारिकदृष्ट्या शंभर वर्षे मागे जाण्यासारखे आहे.

ज्या मुली आज धैर्याने शाळा-कॉलेजमध्ये जात आहेत, त्यांच्या मनातही सुरक्षिततेची भीती सतत घर करून राहत आहे. रस्त्यावरून चालताना, बसमध्ये प्रवास करताना किंवा वर्गात बसतानाही जर मुलींच्या मनात असुरक्षिततेची भावना असेल, तर त्या मोकळेपणाने शिकणार कशा? भीतीपोटी घेतलेले शिक्षण कधीही उत्तम दर्जाचे असू शकत नाही. जर देशातील निम्मी लोकसंख्या असणाऱ्या महिलांना आपण सुरक्षित वातावरण देऊ शकलो नाही, तर देशाचा विकास केवळ कागदावरच राहील. या विकृतीचा वेळीच बिमोड करणे ही आज काळाची गरज आहे.

यासाठी केवळ हळहळ व्यक्त करून चालणार नाही, तर आपल्याला काही कठोर आणि ठोस उपाययोजना कराव्या लागतील.

शिक्षण क्षेत्राला लागलेला हा कलंक आपल्याला सर्वांना मिळून धुवून काढावाच लागेल. शासन, प्रशासन, शाळा आणि समाज या सर्वांनी एकजूट होऊन मुलींना सुरक्षित आणि भयमुक्त वातावरण दिले पाहिजे.

ह्या गोष्टीवर विचार मंथन होणे अत्यावश्यक आहे.

''मुलगी
वाचवा,
मुलगी
शिकवा
आणि मुलीला
सुरक्षित
ठेवा!''



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव**
**८९९९५६६९१७**

## पान १ वरुन

### महापालिकेचा बुलडोझर ...

स्वच्छता निरीक्षक शोएब खान, मांस प्रतिबंध कार्यवाही प्रमुख अमजद खान, लिपिक अजय पेम्बर्ती यांच्यासह उत्तम लाडाने, कादर खान, आमेर खान आणि महापालिकेचे २५ ते ३० सफाई व सुरक्षा कर्मचारी सक्रियपणे सहभागी झाले होते. पथकाने दुपारपर्यंत संपूर्ण परिसरातील नाले अतिक्रमणमुक्त केले.

**अतिक्रमण मोहीम सातत्याने सुरूच राहणार!**

''भाजीमंडी परिसरातील मुख्य नाले बुजल्यामुळे आरोग्याचा आणि वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. हे नाले पूर्णपणे मोकळे करण्यासाठीच आजची कारवाई करण्यात आली आहे. शहरातील इतर भागांतील नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनीही रस्त्यांवरील व नाल्यांवरील आपली अतिक्रमणे स्वतःहून काढून घ्यावीत, अन्यथा महापालिकेतर्फे ती जप्त करून पाडली जातील. जालन्याला स्वच्छ आणि सुंदर बनवण्यासाठी ही अतिक्रमण निर्मूलन मोहीम यापुढेही शहरात सातत्याने सुरूच राहणार असल्याचे मनपा सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांनी स्पष्ट केले.

### ई-स्कूटरने ...

प्रदूषण आणि इंधन दर यामुळे पर्यायी ऊर्जेचा वापर वाढवणे आवश्यक आहे. नागरिकांनी शक्य तिथे इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करून पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घ्यावा.''
दरम्यान, उपमहापौरांच्या या कृतीमुळे महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्येही ई-वाहनांच्या वापराबाबत सकारात्मक चर्चा सुरू झाली आहे. भविष्यात शहरातील अधिकाधिक लोकप्रतिनिधी आणि नागरिक पर्यावरणपूरक वाहनांचा स्वीकार करतील, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.
जालना शहरात वाहतूक आणि प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत असताना, अशा प्रकारचे उपक्रम जनजागृतीसाठी महत्त्वाचे ठरत असल्याचे मत पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले आहे. उपमहापौरांनी दिलेला हा संदेश केवळ इंधन बचतीपुरता मर्यादित नसून, भावी पिढीसाठी स्वच्छ आणि निरोगी पर्यावरण निर्माण करण्याच्या दिशेने टाकलेले एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे.

### रुग्णांनी आवश्यक ...

साधून मदत मिळवावी, असे अधिकृत आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त श्री. जी. डी. जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

### सरकारने शेतकरी ...

जनतेच्या जिव्हाळ्याच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर शिवसेना शांत बसणार नाही. आम्ही लोकशाही मार्गाने आणि अधिक आक्रमकपणे रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडू. होणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी सर्वस्वी शासनाची आणि प्रशासनाची असेल,'' असा स्पष्ट इशारा घुगे यांनी आपल्या भाषणातून दिला.
यावेळी शिवसेनेचे (उबाठा) स्थानिक पदाधिकारी, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, युवासेनेचे कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

### संशयित गोवंशाच्या ...

परिस्थिती नियंत्रणात आणली आणि संबंधित ऑटो रिक्षाची पाहणी केली. प्राथमिक तपासात वाहनातील मांस हे गोवंश जातीचेच असल्याचे निष्पन्न झाले आहे.

१५० किलो मांस जप्त; गुन्हा दाखल

पोलीस प्रशासनाने घटनास्थळाचा रीतसर पंचनामा केला असून, ऑटोमधून वाहतूक केले जाणारे अंदाजे १५० किलो संशयित गोमांस जप्त केले आहे. गौरक्षक दलाचे पदाधिकारी राहुल वर्तले यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, ''या बेकायदेशीर आणि संतापजनक प्रकाराविरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे.''

कायदा-सुव्यवस्था राखण्याचे आणि गोवंश कत्तल रोखण्याचे आवाहन

आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर, गौरक्षक दलाचे नेते राहुल वर्तले यांनी पोलीस व जिल्हा प्रशासनाला अधिक सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले:

''महाराष्ट्रात गाईला राजमाताचा दर्जा देण्यात आला असून, हिंदू धर्मात गाय अत्यंत पूजनीय आणि पवित्र मानली जाते. कुठेही गोवंश कत्तल किंवा गोमांसाची बेकायदेशीर वाहतूक होत असेल, तर प्रशासनाने तात्काळ कठोर पावले उचलून गुन्हेगारांना जेरबंद करावे.''

यासोबतच त्यांनी मुस्लिम बांधवांनाही सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन केले आहे. ''आगामी सणाच्या काळात कुठेही गोवंशाची कत्तल केली जाऊ नये, जेणेकरून सामाजिक वातावरण दूषित होणार नाही आणि कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होणार नाही. सर्वांनी एकमेकांच्या धार्मिक भावनांचा आदर राखून शांतता राखावी,'' असे आवाहन वर्तले यांनी केले आहे.

या घटनेनंतर रेवगाव रोड व परिसरात पोलीस प्रशासनाने बंदोबस्त तैनात केला असून, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## भारतीय सशस्त्र दलातील अधिकारी पदासाठी मोफत पूर्व प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**जालना -** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी इच्छुक युवक-युवतींसाठी महाराष्ट्र शासनातर्फे छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे () परीक्षा पूर्व प्रशिक्षण कोर्स क्र. ६७ आयोजित करण्यात आला आहे. हा प्रशिक्षण वर्ग दि. १५ जून २०२६ ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणार असून निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या कोर्सदरम्यान प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षणासोबत निवास व भोजनाचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी दि. ४ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे मुलाखतीस उपस्थित राहावे. मुलाखतीस येताना उमेदवारांनी    ,  यांच्या .... या संकेतस्थळावरील   ( --६७) मधून प्रवेशपत्र व संबंधित परिशिष्टांची प्रिंट काढून ती पूर्ण भरून सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातूनही प्रवेशपत्र उपलब्ध करून दिले जाणार आहे. सदर प्रशिक्षण वर्गासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक असून त्यांनी लोकसेवा आयोग (), नवी दिल्ली यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या  परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्याशी .. या ई-मेलवर अथवा दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ व व्हॉट्सअॅप क्रमांक ९१५६०७३३०६  वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी केले आहे.

# मंदिर-मशिद जवळील देशी दारू दुकान हटवण्यास प्रशासनाचा विलंब का? नागरिकांचा सवाल

# देशी दारूच्या दुकानामुळे नागरिक त्रस्त; नगरपालिकेच्या अहवालात सत्य परिस्थिती समोर!

## नगरसेवक इजरान कुरेशी यांच्या निवेदनाला यश येण्याची शक्यता

**परतूर । प्रतिनिधी -** शहरातील मुख्य बाजारपेठ आणि अत्यंत गजबजलेला परिसर असलेल्या मलंगशहा चौकातील देशी दारूचे दुकान सध्या प्रचंड वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या दुकानामुळे परिसरातील सामान्य नागरिक, महिला आणि व्यापाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यासंदर्भात नगरसेवक इजरान कुरेशी यांनी जिल्हाधिकारी आणि नगरपालिकेकडे केलेल्या लेखी तक्रारीची प्रशासनाने गंभीर दखल घेतली. प्रशासनातर्फे या जागेची प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात आली असून, १२,मे २०२६ रोजी नगरपालिकेने आपला अधिकृत अहवाल सादर केला आहे. या अहवालात नगरपालिकेने तक्रारीतील सर्व मुद्दे आणि सत्य परिस्थिती मान्य केल्याने दारू दुकानाचा काळाबाजार उघड झाला आहे. तसेच नगरसेवक इजरान कुरेशी यांच्या निवेदनाला यश येण्याची शक्यता नाकारत येत नाही तसेच परतूर शहराच्या इतिहासात मलंगशहा चौक हा भाग अत्यंत संवेदनशील आणि सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. या परिसरात मंदिर आणि मशीद अगदी समोरासमोर आणि जवळ आहेत. अशा अत्यंत पवित्र आणि संवेदनशील ठिकाणी देशी दारूचे दुकान असणे हे सामाजिक आरोग्यासाठी आणि धार्मिक भावनेच्या दृष्टीने अत्यंत चुकीचे व घातक आहे. या दुकानामुळे मंदिर-मशिदीत जाणाऱ्या भाविकांना, विशेषत महिलांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागते. नगरपालिकेच्या अहवालात सत्य समोर आलेले असतानाही, हे दुकान तातडीने हटवण्यास प्रशासन नेमका विलंब का करत आहे? असा संतप्त सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. नगरपालिकेने सादर केलेल्या अहवालात मलंगशहा चौकातील वस्तूस्थिती स्वीकारल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांनी तातडीने पावले उचलली आहेत. त्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभाग (दारूबंदी पोलीस) यांना अधिकृत पत्र पाठवून या वादग्रस्त दुकानावर आणि तिथून चालणाऱ्या अवैध प्रकारांवर ताबडतोब ॲक्शन कडक कारवाई आदेश द्यावा तसेच. मुख्याधिकाऱ्यांच्या या पत्रातून मध्ये वाढून दुकानाचे लायसन्स रद्द करून तेथून ते तात्काळ हटवण्यात यावे, अशी एकमुखी मागणी परतूर तालुक्याच्या नागरिकांमधून होत आहे. तसेच या परवानाधारक देशी दारूच्या दुकानातून केवळ किरकोळ विक्री होत नसून, इथून संपूर्ण तालुक्यात अवैध दारूचा पुरवठा केला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तालुक्यात जागोजागी अवैध दारू विकणारे व्यावसायिक या दुकानातून दिवस-रात्र दारूचा साठा घेऊन जातात. दुकानाच्या बाहेर उघडपणे गाड्या उभ्या करून, पोत्यांमध्ये देशी दारूच्या बाटल्या भरून त्या खुल्या गाड्यांवरून वाहून नेल्या जातात. मुख्य बाजारपेठेत आणि धार्मिक स्थळांजवळ सुरू असलेल्या या बेधडक तस्करीचे अनेक पुरावे आता समोर आले आहेत तसेच या परवानाधारक दुकानाच्या आडून संपूर्ण परतूर तालुक्यात बेकायदेशीर दारूचे जाळे पसरत चालले आहे. मात्र, या गंभीर प्रकाराकडे दारूबंदी पोलिसांचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा थेट आरोप नागरिकांनी केला आहे. दारूबंदी पोलिसांच्या याच संशयास्पद भूमिकेमुळे आणि ढिसाळ कारभारामुळे




आज परतूर शहर आणि ग्रामीण भागात अवैध दारू विकणाऱ्यांची संख्या कमालीची वाढली आहे. नगरपालिकेच्या अहवालाने शिक्कामोर्तब केल्यानंतर आता राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीस प्रशासन या दुकानावर कायमची टाळेबंदी ठोकणार की अवैध धंदेवाल्यांना पाठीशी घालणार, याकडे सर्व परतूरकरांचे लक्ष लागले आहे.

---

## जेईएस महाविद्यालयात उन्हाळी लोककला प्रशिक्षण शिबिराचा उत्साहात समारोप

# शालेय विद्यार्थ्यांनी गिरवले महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे आणि संस्कारांचे धडे




**जालना । प्रतिनिधी -** ग्रामीण संस्कृती, लोकपरंपरा आणि महाराष्ट्राच्या समृद्ध लोककलेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय उन्हाळी लोककला प्रशिक्षण शिबिराचा सोमवारी (दि. १८ मे) अत्यंत उत्साहात समारोप झाला.

येथील जेईएस महाविद्यालयाचा लोककला विभाग आणि लोक परिवर्तन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या केंद्रीय सभागृहात सकाळी साडेदहा वाजता झालेल्या या समारोप कार्यक्रमात शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अंगावर रोमांच उभे करणाऱ्या विविध लोककलाप्रकारांनी उपस्थित रसिकांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सागर उदावंत, सतीश लिंगडे, लोकशाहीर आप्पासाहेब उगले तसेच प्रा. यशवंत सोनुने उपस्थित होते. व्यासपीठावर सुप्रसिद्ध शाहीर रामानंद उगले आणि शिबिराचे संचालक व लोककला विभाग प्रमुख प्रा. कल्याण उगले यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी शिबिरातील सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि 'मराठवाड्याची शाहिरी' हे पुस्तक भेट देऊन गौरविण्यात आले.

**विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने जिंकली मने**

सरस्वती पूजन आणि गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. श्रेयस महाजन, स्वानंद धुमाळ, धनश्री इंगोले आणि पंखुडी श्रॉफ यांनी ''नमो शारदे तुला गणपते'' हा गण सादर करून सभागृह भक्तिमय केले. त्यानंतर अथांग, गिरीराज, मंथन आणि आदित्य उगले यांनी ''वंदे मातरम्'' हा शाहिरी मुजरा सादर करत उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली. बालशाहीर स्वराज्य धुमाळ याने ''स्वराज्य घडवलं'' हे शिवगीत सादर करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची आठवण जागवली, तर अन्य विद्यार्थ्यांनी ''राज्याभिषेक'' गीताद्वारे स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन केले.

**ग्रामीण संस्कृतीचा दरवळला गंध**

धनश्री इंगोले आणि पंखुडी श्रॉफ यांनी ''जात्यावरच्या ओव्या'' सादर करत ग्रामीण संस्कृती, स्त्रीजीवन आणि श्रमसंस्कृतीचे दर्शन घडवले. यानंतर स्वानंद धुमाळ व आदित्य उगले यांनी पारंपरिक वेशभूषेत ''गोंधळ'' सादर केला. धनश्री व पंखुडी यांनी ''पैठणचा शालू आज'' या लावणीद्वारे रसिकांची वाहवा मिळवली. धनराज घुले या विद्यार्थ्याने सादर केलेल्या ''लखाबाईचा पोतराज'' या कलाप्रकाराला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजर दाद दिली.

**लोककला हा मनोरंजनाचा नव्हे, तर संस्काराचा भाग : मान्यवर**

शिबिराचे संचालक प्रा. कल्याण उगले यांनी प्रास्ताविकात शिबिराच्या आयोजनामागील भूमिका मांडली. विद्यार्थ्यांमध्ये लोककलेची आवड निर्माण व्हावी, मंचावरील सादरीकरण कौशल्य, ताल-लय आणि अभिनय विकसित व्हावा म्हणून हे प्रशिक्षण देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. उगले यांनी १० दिवस विद्यार्थ्यांना शाहिरी, गोंधळ, पोतराज, लावणी, ओव्यांचे सखोल मार्गदर्शन केले होते.

मार्गदर्शन करताना सतीश लिंगडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत किमान एक लोककला आत्मसात करावी, जेणेकरून मातीशी नाळ टिकून राहील. सागर उदावंत यांनी कलाक्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सातत्यपूर्ण साधना व शिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. लोकशाहीर आप्पासाहेब उगले यांनी, ''लोककला शिक्षण म्हणजे केवळ मनोरंजन नव्हे, तर तो एक संस्कार आहे,'' असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते यांनी लोककला विभाग भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करत राहील, अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन स्वाती मेहत्रे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शाहीर रामानंद उगले यांनी मानले. या प्रसंगी शिबिरार्थी विद्यार्थी त्यांचे पालक आणि रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

---

# रोटरी क्लबचा मदतीचा हात: १ लाख शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सुटणार

## सौर ऊर्जा सिंचन पंप बँक प्रकल्पाचे लोकार्पण



**जालना । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांना सिंचनासाठी (पिकांना पाणी देण्यासाठी) सक्षम बनवणारा आणि ग्रामीण भागाचा कायापालट करणारा एक अत्यंत महत्त्वाचा उपक्रम रोटरीच्या ग्लोबल ग्रँट अंतर्गत जालन्यात सुरू झाला आहे. रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनतर्फे जालना जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या ''पोर्टेबल सोलर इरिगेशन पंप बँक'' या प्रकल्पाचे लोकार्पण येथील हॉटेल सॅफ्रॉनमध्ये प्रांतपाल सुधीर लातुरे यांच्याहस्ते करण्यात आले. मोफत वापरा आणि पिकांची पाणीभरणी झाल्यानंतर संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीला परत करा, या तत्त्वावरील हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आत्मनिर्भर आणि शाश्वत भविष्याकडे वाटचाल करणाऱ्या एक लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण ठरणार आहे.

या प्रकल्पासाठी द रोटरी फाउंडेशन, अमेरिका यांच्याकडून ३० लाख रुपयांपेक्षा अधिक निधी मिळाला आहे. तसेच या कामात ऑस्ट्रेलियाच्या रोटरी क्लब ऑफ नॉर्थ रायडचे विशेष सहकार्य लाभले आहे.

अनियमित वीजपुरवठा आणि पावसाची अनिश्चितता यामुळे शेतीचे मोठे नुकसान होते. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातील ७० हून अधिक शेतकरी उत्पादक संस्थांशी जोडलेल्या एक लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना याचा थेट फायदा होणार असून त्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. शेतकरी उत्पादक कंपन्यांना ७० सोलर पंप सुपूर्द करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळांने प्रत्यक्ष सर्वेक्षण करून शेतकरी उत्पादक कंपन्यांची पारदर्शी पद्धतीने निवड केली असून, या कंपन्यांशी संलग्न शेतकऱ्यांना निशुल्क वापरण्यासाठी हे सौरऊर्जा पंप मिळतील. सिंचनाचे काम झाल्यानंतर इतर शेतकऱ्यांना लाभ घेता यावा यासाठी त्यांनी ते पुन्हा कंपनीकडे परत करावयाचे आहेत. ''मेड इन इंडिया'' तंत्रज्ञानावर आधारित फ्युचर कंपनीच्या या पंपांना १० वर्षांची हमी असून ही तंत्रज्ञान प्रणाली सध्या जगातील ९० हून अधिक देशांमध्ये निर्यात होत आहे.

सोलर पंप लोकार्पण सोहळ्यात बोलताना रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी रोटरी जालना मिडटाउनच्या सातत्यपूर्ण समाजोपयोगी कार्याचे कौतुक करत हा क्लबचा चौथा यशस्वी ग्लोबल ग्रँट प्रकल्प असल्याचे सांगितले. माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनीही टीमचे अभिनंदन करत एनजीओ भागीदार सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ यांच्या शेतकरी जनजागृती आणि संपर्क मोहिमेतील योगदानाचा गौरव केला.

प्रस्ताविकपर भाषणात रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनचे अध्यक्ष अंकित अग्रवाल म्हणाले की, हा प्रकल्प शेतकऱ्यांना विश्वासार्ह आणि शाश्वत सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच जलसंवर्धन आणि आधुनिक शेती पद्धतींबाबत जनजागृती करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. रोटरीतर्फे परळी येथील ग्लोबल विकास ट्रस्टमध्ये शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण सत्रांचे आयोजनही करण्यात येत असून, त्यामधून शाश्वत शेती आणि जलसंवर्धनाच्या पद्धतींचा प्रचार करण्यात येत आहे.

या प्रकल्पामागील संकल्पना आणि गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेल्या प्रयत्नांविषयी माहिती देताना रोटरी ग्लोबल ग्रँट लीड डॉ. अनुप करवा म्हणाले की, या प्रकल्पाची सुरुवात मेलबर्न, ॲडलेड आणि सिडनी येथील रोटरी भागीदारांच्या सहकार्याने झाली. ऑस्ट्रेलियातील रोटरी भागीदार आणि पर्यावरणप्रेमी अभियंता बॉब सेलिंगर यांच्या मदतीने हा प्रकल्प आकारास आला आहे. या सौर ऊर्जा पंप तंत्रज्ञानाला गेट्स फाउंडेशन आणि युएसएआयडी यांसारख्या संस्थांची मान्यता मिळालेली असून ते ९० पेक्षा अधिक देशांमध्ये निर्यात केले जात आहेत. या प्रकल्पासाठी जालना जिल्ह्यातील ७० हून अधिक शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून १ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या सिंचन सुविधा, अन्नसुरक्षा आणि उत्पन्न स्थैर्यात सकारात्मक बदल घडून येणार आहे. जागतिक भागीदारीतून स्थानिक स्तरावर प्रभावी परिवर्तन कसे घडवता येते, याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे, असेही डॉ. करवा यांनी नमूद केले.

या सोहळ्याला सहाय्यक प्रांतपाल संजय राठी, सौ. संगीता लातुरे, मिडटाउन क्लबच्या सचिव राजनंदिनी राठौर, दीपांक अग्रवाल, अनूप जाजू, योगेश पाटणी, आलोक नानावटी, मनमोहन भक्कड, सागर दक्षिणी, करण अग्रवाल, धवल मिश्रीकोटकर, कैलास राठोड, सावित्रीबाई फुले मंडळातील शेतकरी, फ्युचर पंप कंपनीचे जितेंद्र लाखानी तसेच रोटरीचे पदाधिकारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार राजनंदिनी राठौर यांनी मानले.

---

# महाराष्ट्रात मतदार याद्यांची विशेष सखोल पुनरिक्षण मोहिम; ९.८६ कोटी मतदारांच्या घरी पोहोचणार निवडणूक यंत्रणा

**जालना । प्रतिनिधी -** भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष सखोल पुनरिक्षण () मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे.

**बीएलओच्या प्रत्यक्ष घरांना भेटी**

महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात राज्यातील एकूण ९,८६,४४,४१३ मतदारांच्या तपशिलाची खातरजमा मतदान केंद्रस्तरीय अधिका-यांमार्फत ()नियुक्त करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले बूथ लेव्हल एजंट्स () त्यांना सहकार्य करणार आहेत.

**जनगणनेच्या कामाशी सांगड**

सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल.

**महाराष्ट्रासाठीचे महत्त्वाचे वेळापत्रक:**

दिनांक २० ते २९ जून २०२६ या कालावधील बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करण्यात येईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येतील. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल तसेच ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती नोंदविता येतील आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिद्ध करण्यात येईल.

*राजकीय पक्षांना आवाहन*

भारत निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट () नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे.

CHANGE IN NAME
दै युवा आदर्श दि. 19.05.2026
Old name Atishkumar Ashok mor..
New name - Atish Ashok mor
Is as per my documents
Adress- ladda colony., relve station,
Partur dist jalna - 431501
Affidavit no. 76AB 868112

# जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांचा सत्कार

## हॉटेल, मॉल आणि फॅमिली रेस्टॉरंटची वेळ वाढवून देण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी पदभार स्वीकारल्यानंतर जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातील व्यापारी व उद्योजकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली.

जालना हे व्यापारी आणि उद्योजकांचे शहर म्हणून ओळखले जाते. सध्या कडक उन्हाळ्यामुळे नागरिक दिवसभर घराबाहेर कमी पडत असून सायंकाळी उशिरा हॉटेल, मॉल आणि फॅमिली रेस्टॉरंटमध्ये गर्दी वाढत असल्याचे व्यापारी महासंघाच्या वतीने सांगण्यात आले. त्यामुळे व्यवसायावर परिणाम होत असल्याने फॅमिली रेस्टॉरंट, हॉटेल आणि व्यापाऱ्यांनी व्यवसायाची गरज लक्षात घेता वेळ वाढवून देण्याची विनंती जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली.

कॉमर्सचे जनरल सेक्रेटरी श्याम लोया जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी जालना जिला व्यापारी महासंघाचे महासचिव



रेस्ट हाऊसच्या वेळेत वाढ करण्याची मागणी करण्यात आली.

सध्या जालना शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि रेस्ट हाऊस रात्री साडेदहा वाजेपर्यंत सुरू ठेवण्याचे आदेश लागू आहेत. मात्र

व्यापाऱ्यांच्या मागणीवर सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिल्याची माहिती व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.यावेळी

मराठवाड़ा चैंबर ट्रेड एंड संजय दाढ़ कोषाध्यक्ष विजय राठी कार्याध्यक्ष दिलीप भाई शाह उपाध्यक्ष मोहन इंगळे कार्यकारिणी सदस्य लक्ष्मीनारायणजी मानधना लीगल एडवाइजर एडवोकेट ईश्वर बिल्हौरे आदिची उपस्थिती होती.

### व्यापारी महासंघाची मागणी

जालना जिल्हा मुख्यालयाचे शहर असून येथे मोठ्या प्रमाणात हॉटेल, मॉल व व्यावसायिक आस्थापना आहेत. सध्या जिल्हा पोलीस प्रशासनाने हॉटेल व मॉल सुरू ठेवण्याची वेळ रात्री साडेदहापर्यंत निश्चित केली आहे. मात्र नागरिक सायंकाळी उशिरा घराबाहेर पडत असल्याने तसेच बाहेरगावाहून येणाऱ्या पाहुण्यांनाही याचा फटका बसत असल्याचे व्यापारी महासंघाने म्हटले आहे.

पोलीस कारवाईमुळे नागरिक आणि ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून व्यवसायावर परिणाम होत असल्याची भावना व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. त्यामुळे जालना शहराची व्यापारी ओळख लक्षात घेऊन हॉटेल, मॉल आणि फॅमिली रेस्टॉरंटची वेळ वाढवून देण्यात यावी, अशी मागणी व्यापारी महासंघाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्याकडे करण्यात आली आहे.

# जालना जिल्ह्यात पुढील दोन दिवस उष्णतेची तीव्र लाट कायम राहण्याची शक्यता

## नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी - जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** भारत हवामान विभागाने दिनांक १८ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या हवामान अंदाजानुसार मराठवाडा विभागात पुढील दोन दिवस उष्णतेची लाट ( ) कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून जालना जिल्ह्यात तापमानात वाढ होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनामार्फत सर्व नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत वाढत्या तापमानामुळे उष्माघात, निर्जलीकरण तसेच उष्णतेशी संबंधित आरोग्य समस्या उद्भवण्याची शक्यता असून विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला, शेतकरी, शेतमजूर, बांधकाम कामगार तसेच मैदानी भागात काम करणाऱ्या नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी. नागरिकांनी दुपारी १२ ते सायंकाळी ४ या कालावधीत अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे. भरपूर पाणी पिणे, ओआरएस, ताक, लिंबूपाणी, घरगुती पेये यांचे सेवन करणे, हलके व सुती कपडे वापरणे तसेच डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करावा. उष्णतेमुळे चक्कर येणे, अशक्तपणा, उलटी, ताप, जास्त घाम येणे किंवा बेशुद्धावस्था जाणवल्यास तात्काळ जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार घ्यावेत.

जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांना उष्माघात बाधित रुग्णांवर तातडीने उपचारासाठी सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून आवश्यक औषधसाठा, ओआरएस, पिण्याचे पाणी व इतर सुविधा उपलब्ध ठेवण्याबाबत आरोग्य विभागास निर्देश देण्यात आले आहेत. तसेच ग्रामपंचायत, नगर परिषद व नगरपालिका स्तरावर सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पाणपोई व सावलीची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. शाळा, अंगणवाडी, बांधकाम स्थळे तसेच मनरेगा कामांमध्ये दुपारच्या वेळेत आवश्यक ती काळजी घेण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

शेतकरी बांधवांनी सकाळी अथवा सायंकाळी पिकांना हलके सिंचन करावे. भाजीपाला व फळबागांमध्ये मल्चिंग, शेडनेट आदी उपाययोजना कराव्यात. जनावरांना पुरेसे पिण्याचे पाणी व सावली उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून सर्व संबंधित विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता जिल्हा प्रशासन व हवामान विभागाने वेळोवेळी जारी केलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे

# टेंभुर्णी चे माजी सरपंच विष्णू जमधडे यांना भावपूर्ण श्रध्दांजली



**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील माजी सरपंच तथा जाफ्राबाद कुषी उत्पादन बाजार समितीचे संचालक गाव तंटामुक्त समितीचे अध्यक्ष ग्रामसंसद सदस्य असलेले विष्णू विठोबा जमधडे यांचा १५ मे शुक्रवारी पावणे आठ च्या दरम्यान आपघात झाला यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला यामुळे अचानक घडलेल्या घटनेने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे...

येथील सामाजिक आणि सदैव तत्पर असलेल्या सदाबहार व्यक्ती महत्त्व रोखठोकपणे बोलणं गेल्या वीस वर्षां पासून सतत राजकीय क्षेत्रातील चेहरा असलेले कै विष्णू विठोबा जमधडे वयाची सत्तरी गाठ असताना अचानक आपघात घडला आणि काळाने झडप घातली यामुळे त्यांना दिनांक १८ मे रोजी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने सामूहिक शोकसभा घेण्यात आली यावेळी त्यांच्या जीवनावरील आठवणी ला सर्वांनी उजाळा दिला यामध्ये आदर्श शिक्षक शेख जमीरसर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष रामधन कळंबे जेष्ठ पत्रकार पी जी तांबेकर चेअरमन राणा अंभोरे राजु खोत फैसल चाउस लक्षण शिंदे डॉ. सतिश चंदनशिवे संतोष पाचे , बाबु जाधव बाळू धनवाई रवींद्र उखर्डे शंकर भागवत पांडुरंग बोरसे अकुंश देशमुख सुनिल देशमुख सर्जेराव कुमकर दत्तू सुद्रिक गणेश गाडेकर फकिरचंद खंडेकर राजु करवंदे विठ्ठल सातभाई ज्ञानेश्वर उखर्डे पप्पू शिंदे गुड्डू मघाडे रवि खरात बालाजी शेवाळे अलेश सोमाणी संजय डोईफोडे लिंबाजी जाधव गणेश धनवाई मुरली कुमकर जमीर सर यांच्या सह गावातील सामाजिक कार्यकर्ते व्यापारी शिक्षक शेतकरी कर्मचारी आदींची उपस्थिती होती कार्यक्रमाचे मुख्य आयोजक सरपंच प्रतिनिधी गौतम म्हस्के ग्रामविकास अधिकारी जगदीश आढाव अजीस बागवान डिगंबर भिसे सुनिल भाले शंकर योगेश गायमुखे आढावे रामदास धनवाई भिका माने घोडे अनिल गायकवाड व आदींनी परिश्रम घेतले

## २०२६ चा उष्ण काळ : विकास, विनाश आणि अस्तित्वाचा प्रश्न

# वाढत्या तापमानाने मानवजातीसमोर उभे केले गंभीर संकट; पर्यावरण संवर्धनासाठी तातडीने कृतीची गरज

**जालना । प्रतिनिधी -** जगभरात वाढत चाललेले तापमान, असह्य उष्णतेच्या लाटा आणि बदलत चाललेले हवामान यामुळे संपूर्ण मानवजातीसमोर अस्तित्वाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. "२०२६ चा उन्हाळा हा केवळ ऋतू राहिलेला नसून पृथ्वीने मानवाला दिलेला अंतिम इशारा आहे," असे मत दुर्गेश बनकर यांनी व्यक्त केले आहे. United Global Federation India च्या माध्यमातून त्यांनी पर्यावरण संवर्धन आणि हवामान बदलाच्या संकटावर सखोल भाष्य करत समाजाला जागृत होण्याचे आवाहन केले आहे.

दुर्गेश बनकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आज जग एका अशा संकटाचा सामना करत आहे ज्याचे परिणाम अत्यंत भीषण आणि दूरगामी आहेत. वाढते जागतिक तापमान, जंगलतोड, काँक्रीटीकरण, नद्यांवरील अतिक्रमण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अमर्याद वापर यामुळे पृथ्वीचे संतुलन ढासळत चालले आहे. भारतासह अनेक देशांमध्ये तापमानाने विक्रमी उच्चांक गाठला असून, अनेक शहरांमध्ये ४५ ते ५० अंश सेल्सिअसपर्यंत तापमान नोंदवले जात आहे.

त्यांनी पुढे नमूद केले की, ही केवळ आकडेवारी नसून त्या मागे हजारो कुटुंबांचे दुःख आणि संघर्ष दडलेला आहे. रस्त्यावर काम करणारे मजूर, शेतकरी, बांधकाम कामगार, वाहतूक पोलीस आणि उन्हात शिक्षणासाठी लांब अंतर चालणारी मुले या उष्णतेचा सर्वाधिक फटका सहन करत आहेत. वातानुकूलित कार्यालयांमध्ये बसून हवामान बदलावर चर्चा करणाऱ्या समाजाच्या एका वर्गाला आणि प्रत्यक्ष उन्हाच्या झळा सहन करणाऱ्या सामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या वास्तवात मोठी दरी निर्माण झाली आहे.

"विकासाच्या नावाखाली निसर्गावर सातत्याने आघात करण्यात आले. जंगलांची तोड झाली, डोंगर फोडले गेले, नद्या अतिक्रमणात गुदमरल्या आणि शहरांनी काँक्रीटची जंगलं उभी केली. आधुनिकतेच्या अतिरेकामुळे पृथ्वीची नैसर्गिक श्वसनप्रक्रिया थांबण्याच्या मार्गावर आहे," असा गंभीर इशाराही त्यांनी दिला.



हवामान बदलाचा परिणाम फक्त मानवापुरता मर्यादित नसून पशुपक्षी आणि संपूर्ण पर्यावरण व्यवस्थेवर होत असल्याचे त्यांनी सांगितले. भीषण उष्णतेमुळे पक्ष्यांचे मृत्यू वाढत आहेत, जनावरे पाण्याच्या शोधात भटकत आहेत, भूजल पातळी झपाट्याने खाली जात आहे आणि अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. त्याचबरोबर अनियमित पावसामुळे शेतीचे गणित कोलमडत असून अन्नसुरक्षेचाही प्रश्न निर्माण होत आहे.

दशकांपासून वैज्ञानिक आणि पर्यावरण अभ्यासकांनी हवामान बदलाबाबत दिलेले इशारे दुर्लक्षित करण्यात आले, असेही त्यांनी स्पष्ट केले. "पृथ्वी अमर्याद संसाधनांचा स्रोत आहे, अशी चुकीची मानसिकता मानवाने स्वीकारली. परंतु निसर्गाचे स्वतःचे नियम असतात आणि त्यांचे उल्लंघन झाल्यास त्याची मोठी किंमत संपूर्ण मानवजातीला मोजावी लागते," असे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी तातडीने कृती करण्याचे आवाहन केले. प्रत्येक नागरिकाने झाडे लावणे, पाण्याची बचत करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शासन, प्रशासन, उद्योग क्षेत्र, सामाजिक संस्था आणि सामान्य नागरिक यांनी एकत्रितपणे या संकटाचा सामना करण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

United Global Federation India च्या माध्यमातून समाजाला स्पष्ट संदेश देताना दुर्गेश बनकर म्हणाले की, "पर्यावरणाचा प्रश्न हा भविष्यातील नसून वर्तमानातील सर्वात गंभीर प्रश्न आहे. आज घेतलेले निर्णय पुढच्या पिढीचे भविष्य ठरवतील. आपण आजही निष्क्रिय राहिलो, तर उद्याची पिढी पृथ्वीच्या विनाशासाठी आपल्यालाच जबाबदार धरेल."

मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानात मोठी प्रगती केली असली तरी पृथ्वी वाचवण्यात अपयश आले तर त्या प्रगतीला काहीही अर्थ उरणार नाही, असे सांगत त्यांनी शेवटी एक भावनिक संदेश दिला "माणूस तंत्रज्ञानावर नाही, तर निसर्गावर जगतो. निसर्गावर विजय मिळवण्याचा प्रयत्न करणारा मानव शेवटी निसर्गाशिवाय जगू शकत नाही, हीच पृथ्वीची अंतिम सत्यता आहे."

# विवाहाचा नवा आदर्श निर्माण केल्याबद्दल देवराव देशमुख यांचा ग्रामपंचायत सदस्यांतर्फे सत्कार

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** समाजात दिवसेंदिवस वाढत चाललेला विवाहातील अनाठायी खर्च, दिखाऊपणा आणि आर्थिक स्पर्धे च्या पार्श्वभूमीवर टेंभुर्णी येथील ज्येष्ठ समाजसेवक देवराव देशमुख यांनी आपल्या नातवाचा आदर्श आणि साधेपणाने विवाह सोहळा पार पाडत समाजासमोर एक सकारात्मक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या सामाजिक जाणिवेच्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, टेंभुर्णी ग्रामपंचायत सदस्य आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

टेंभुर्णी येथील महेश शिक्षण संस्था चे अध्यक्ष, दत्त संस्थानचे अध्यक्ष तसेच महेश पतसंस्थेचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले देवराव देशमुख यांनी आपल्या नातवाचा विवाह अत्यंत साधेपणाने आणि सामाजिक बांधिलकी जपत पार पाडला. वाढत्या विवाह खर्चामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण निर्माण होत असताना, त्यांनी समाजाला योग्य दिशा देणारा आदर्श घालून दिल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर टेंभुर्णी येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच संजय गांधी निराधार योजनेच्या जाफराबाद तालुका समितीचे सदस्य भिकन भाई पठाण, टेंभुर्णी ग्रामपंचायत सदस्य प्रा. रवींद्र उखर्डे, सामाजिक कार्यकर्ते सादिक भाई यांच्या हस्ते देवराव देशमुख तसेच मुलाचे वडील दिनकर देशमुख यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सहृदय सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी बोलताना सांगितले की, आजच्या काळात विवाह समारंभ हे प्रतिष्ठेचे प्रदर्शन बनत चालले आहेत. लाखो रुपयांचा खर्च, अनावश्यक दिखाऊपणा आणि सामाजिक स्पर्धेमुळे सामान्य कुटुंब आर्थिक अडचणीत सापडत आहेत. अशा परिस्थितीत देवराव देशमुख यांनी कृतीतून समाजासमोर आदर्श निर्माण करत साधेपणाचा संदेश दिला आहे. समाजाला अशाच सकारात्मक आणि विचारप्रवर्तक कार्यांची नितांत गरज असल्याचे मतही उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात वेध रायगडाचे प्रतिष्ठान महाराष्ट्र चे प्रांत उपाध्यक्ष दत्ता देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच भास्कर देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, या आदर्श विवाह उपक्रमामुळे परिसरात सकारात्मक चर्चा सुरू झाली असून, विवाह समारंभात साधेपणा आणि सामाजिक जबाबदारी जपण्याची गरज अधिक अधोरेखित झाली आहे. समाजात वाढत्या खर्चिक परंपरांना आळा घालून सुसंस्कृत आणि विचारप्रधान विवाह पद्धतीला प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांची प्रेरणा अनेकांना मिळणार असल्याचे मत ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



# अध्यक्षपदी शेजूळ, उपाध्यक्षपदी पाचे सदस्यपदी धनराज देशमुख

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी केल्या जाते मोठ्या उत्साहाने टेंभुर्णी मध्ये उत्साहाचे वातावरण असते. याप्रसंगी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उत्सव समितीची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली.







यात अध्यक्षपदी अनिल शेजूळ , उपाध्यक्षपदी संतोष पाचे, तर सदस्य पदी धनराज देशमुख यांची निवड केली. सदस्यपदी योगेश पेटोळे, दत्ता सोनसाळे, ऋषिकेश सोनसाळे, एकनाथ धारे, विठ्ठल जोशी, शंकर पाचे, , अमोल मैंद, प्रदीप पेटोळे, लहू जोशी, कृष्णा पाचे, संतोष पाचे, समाधान पाचे, अमोल पाचे, दीपक पेटोळे, गोपाल पेटोळे, सुमित जोशी, विलास जोशी, नारायण सोनसाळे, पवन जोशी, फकीरबा सोनसाळे, सचिन मुगटराव, विष्णू सोनसाळे, वाल्मीक सोनसाळे, विठ्ठल मैंद, अंकुश जोशी, वेदांत सोनसाळे यांचा समावेश आहे. यावर्षीही ३१ मे रोजी जयंती उत्साहात साजरी केली जाणार आहे. धनराज देशमुख यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी संपर्क करताना सांगितले की विविध कार्यक्रमाने यावर्षी उत्सव समिती जयंती साजरी करणार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.